**विषय :- महामंडळातील कंपनी सचिव या पदाच्या मुलाखतीबाबत.**

**संदर्भ :- सिडको संकेतस्थळावर तसेच राज्यस्तरीय मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात दिनांक २४.०५.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात.**

संदर्भाधीन विषयान्वये कंपनी सचिव या पदासाठीच्या कागदपत्र छाननीनंतर पात्र व अपात्र उमेदवारांची यादी दिनांक १८.०९.२०२३ रोजी सिडको संकेत स्थळावर खालील ३ तक्त्यांमध्ये प्रसिध्द करण्यात आली होती.

**तक्ता क्र. १-** अपात्र उमेदवारांची यादी (उमेदवारांची संख्या - 26)
**तक्ता क्र. २ -** जाहिरातीमध्ये नमुद पात्रता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची यादी-(उमेदवारांची संख्या - 10)
**तक्ता क्र. ३-** जाहिरातीमध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक कागदपत्र सादर न करणाऱ्या परंतु अर्जामध्ये शैक्षणिक पात्रता / अनुभव, अधिवास प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक माहिती नमुद असलेल्या उमेदवारांची यादी (उमेदवारांची संख्या - 23)

वरील तक्ता क्र.३ मधील उमेदवारांना त्यांच्या नावा समोर नमूद आवश्यक कागदपत्रे दिनांक ०३.१०.२०२३ रोजी संध्याकाळी 5.00 वाजे पर्यंत वैयक्तिकरित्या किंवा पोस्ट / कुरिअरद्वारे सादर करणे आवश्यक असण्याबाबत कळविण्यात आले होते. तद्नंतर दिनांक ०3.१०.२०२३ रोजी सिडको संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या सुचनेद्वारे सदर मुदत दिनांक ०६.१०.२०२३ रोजी संध्याकाळी 5.00 वाजे पर्यंत वाढविण्यात आली होती. तसेच सदर सुचनेद्वारे नमुद दिनांकापर्यंत कागदपत्रे सादर न केल्यास उमेदवारांस दिनांक ०६.१०.२०२३ रोजी होणाऱ्या मुलाखतीसाठी संधी देण्यात येणार नाही असे कळविण्यात आले होते.

दिनांक १८.०९.२०२३ रोजी सिडको संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या तक्ता क्र.३ मधील २३ उमेदवारांपैकी खालील उमेदवाराने कागदपत्रे जमा केली आहेत :-

| **अ.क्र** | **उमेदवाराचे नाव** |
|---|---|
| 1 | तिवारी अमृता |

सबब, खालील उमेदवारांना दिनांक १०.१०.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता महाव्यवस्थापक (कार्मिक) सिडको लि. सिडको भवन, दुसरा मजला, कार्मिक विभाग, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याबाबत सुचित करण्यात येत आहे.

| **अनुक्रमांक** | **उमेदवाराचे नाव** | **शेरा** |
|---|---|---|
| 1 | गुरव सुवर्णलता सुमित | पात्र |
| 2 | शिंदे विनायक मधुकर | पात्र |
| 3 | शिंदे महेंद्र दिलीप | पात्र |
| 4 | पौनिकर अमिता नितीन | पात्र |
| 5 | क्षीरसागर अनुजा रवींद्र | पात्र |
| 6 | अहिरे योगेंद्र एकनाथ | पात्र |
| 7 | भागवत चंद्रकांत छोटुलाल | पात्र |
| 8 | शेवाळे तृप्ती हेमंत | पात्र |
| 9 | कांबळे अश्विनी पुंडलिक | पात्र |
| 10 | शर्मा आरती इंदरजीत | पात्र |
| 11 | तिवारी अमृता | पात्र |

❖ **मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांसाठी सूचना:**

1. उमेदवारांनी किंवा त्यांच्या वतीने किंवा त्यांच्या निवडी/भरतीच्या संदर्भात राजकीय किंवा इतर बाहेरील प्रभाव आणण्यासाठी केलेल्या कोणत्याही दबावामुळे उमेदवारी अपात्र ठरेल आणि पोलिस कारवाईला पात्र ठरतील.
2. मुलाखतीची तारीख/वेळ/स्थळ बदलण्याची कोणतीही विनंती मान्य केली जाणार नाही. जर उमेदवार वर नमूद केलेल्या तारखेला आणि वेळेला मुलाखतीला हजर झाला नाही, तर त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.
3. उमेदवारांनी स्वतःच्या खर्चाने मुलाखतीला उपस्थित राहणे आवश्यक आहे आणि सिडको प्रवास किंवा निवास किंवा इतर कोणताही खर्च उचलणार नाही.
4. भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने दिलेली कोणतीही खोटी/चुकीची माहिती आढळल्यास, त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.
5. भरतीशी संबंधित सर्व बाबींमध्ये व्यवस्थापनाचा निर्णय अंतिम असेल आणि कोणताही वैयक्तिक पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
6. सिडकोशी संबंधित असल्याचा दावा करणाऱ्या मध्यस्थ / चोर / व्यक्तीच्या आश्वासनापासून उमेदवाराने सावध असणे आवश्यक आहे.
7. या भरती मोहिमेशी संबंधित पुढील सर्व घोषणा/तपशील वेळोवेळी सिडको वेबसाइट www.cidco.maharashtra.gov.in वर "करिअर" विभागात प्रकाशित केले जातील. या व्यतिरिक्त उमेदवारांचा दुसऱ्या कुठल्याही साधनांद्वारे (पत्र/ टेलिफोन/ई-मेल) संपर्क करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक - 06.10.2023** **महाव्यवस्थापक (कार्मिक)**